प्र
क
र
ण
पा
च
वे

**स**
**मा**
**रो**
**प**



### प्रकरण पाचवे

# समारोप

मारुती चितमपल्ली यांच्या निसर्ग साहित्याचा ('पक्षी जाय दिगंतरा' व 'जंगलाचं देणं' या संग्रहांच्या आधारे) विविधांगाने अभ्यास केल्यानंतर त्यांच्या वाङ्‌मयाची काही प्रमुख वैशिष्ट्ये दिसून येतात. ज्यामुळे त्यांचे साहित्य इतरांपेक्षा निराळे ठरते. त्यांच्या साहित्यातील गुणविशेषांचा विचार यापूर्वीच्या प्रकरणातून केलेला आहे. त्या आधारे पुढील निष्कर्ष हाती लागतात.

मारुती चितमपल्ली यांचे निसर्गलेखन प्रामुख्याने ललित गद्य या वाङ्‌मय प्रकारात समाविष्ट होणारे आहे. त्यामुळे ललित निबंधाचे स्वरूप जाणून घेणे आवश्यक वाटल्याने ललित निबंधाविषयीची चर्चा पहिल्या प्रकरणात केली आहे. मुळात ललित गद्य हा अत्यंत तरल वाङ्‌मय प्रकार आहे. कारण ललित गद्यात 'मी'चा आविष्कार घडत असतो. लेखकाच्या प्रकृतीनुसार त्याच्या अनुभवविश्वानुसार व आत्माविष्करणाच्या धाटणीनुसार ललित गद्याचे स्वरूप बदलत जाते. ललित गद्यात खेळकरपणा, मोकळेपणा, सुहृदभाव, नाट्यात्मता, काव्यात्मता असे अनेक गुण आढळतात. परंतु 'मी'चा मुक्तपणे पण कलात्मक पातळीवर पोहोचणारा आविष्कार ललित गद्यात महत्त्वाचा ठरतो.

मराठी ललित गद्यातील स्थित्यंतरांचा मागोवा घेतला असता असे लक्षात येते की, अनुभव व अभिव्यक्तीतील वैविध्यानुसार मराठी ललित गद्यात स्थित्यंतरे आली आहेत. ही स्थित्यंतरे म्हणजे मराठी ललित गद्याच्या विकासातील महत्त्वाचे टप्पे होत. मराठी ललित गद्याच्या आद्यप्रवर्तनाचे मानकरी ठरलेल्या ना. सी. फडक्यांनी गुजगोष्ट नावाने जे लेखन इ.स. १९२५ च्या पार्श्वभूमीवर केले, ते लेखन म्हणजे मराठी ललित गद्याची पूर्वपीठिका होय. फडके, खांडेकर, काणेकर यांनी हा लघुनिबंध लोकप्रिय केला खरा परंतु तंत्रनिष्ठेचा शाप त्यांच्या लेखनाला लागला. त्यामुळे तंत्रनिष्ठेशी इमान राखत ललित लेखकांनी लेखन केले. या काळात, गुजगोष्ट, लघुनिबंध, आत्मनिबंध अशा नावांनी हा वाङ्‌मयप्रकार ओळखला जाऊ लागला. पुढे लघुनिबंधात चिंतनशील काव्यात्म लेखनाला अवसर मिळत गेला. कुसुमावती देशपांडे, गो. वि. करंदीकर, माधव आचवल, मंगेश पाडगावकर यांनी काव्यात्म, ललितसुंदर व मुक्त असे रूप या लेखनाला दिले. त्यामुळे ललितनिबंध या नावाने हा वाङ्‌मयप्रकार ओळखला जाऊ लागला. एक लवचीक प्रसरणशीलता या ललितनिबंधात आढळत होती.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात विविध अनुभवविश्वाशी नाते सांगणारे लेखक ललित लेखन करू लागले. त्यामुळे ललित लेखनाचे क्षेत्र वाढीस लागले. त्याबरोबर ललित गद्यात साहित्यप्रकारांच्या

सीमा धूसर होऊ लागल्या. विनोद, पत्रलेखन, व्यक्तिचित्रण, आत्मचिंतन, प्रवासवर्णन, निसर्गचित्रण, आठवणींपर लेखन अशा विविध अंगांनी ललित गद्याचा वृक्ष बहरू लागल्याचे दिसते. ललित निबंध कधी कवितेशी, कधी कथेशी तर कधी आत्मकथनाशी नाते सांगू लागला. त्यामुळे मुक्त-निबंध, ललित-गद्य अशी नामाभिधाने त्याला लाभली. ललित गद्याच्या विकासाच्या या वेलांटी वळणावर निसर्गचित्रणात्मक ललित-गद्याची निर्मिती होऊ लागली. मारुती चितमपल्ली हे निसर्ग साहित्याशी संबंधित असे अग्रेसर नाव.

मराठी ललित गद्यातील निसर्गरेखनाच्या पार्श्वभूमीवर चितमपल्ली यांचे निसर्गलेखन आपले निराळेपण जपणारे आहे. मराठी साहित्यिकांकडून अलक्षित राहिलेला अरण्यानुभव त्यांच्या लेखनात आपल्या सर्व गुणविशेषांसह प्रकटलेला आहे. पशु-पक्षी, वृक्ष-वल्ली, अरण्य, जलाशय, छाया-प्रकाश व जंगलातील माणूस यांना या लेखनांत व्यक्तित्व लाभलेले आढळते. भावदर्शनासाठी व पार्श्वभूमी म्हणून येणाऱ्या निसर्गाची मराठी साहित्यातील भूमिका चितमपल्लींनी बदलली व त्याच्याकडे नायकाची भूमिका त्यांनी सोपविली. त्यामुळेच निसर्गाला केंद्रस्थानी मानून, त्याला नायकत्व देऊन केलेले हे लेखन मराठी साहित्यात एक हिरवी वाट निर्माण करणारे ठरले आहे.

मराठी साहित्यविश्वाला 'जंगलाचे देणे' मिळवून देणाऱ्या चितमपल्लींच्या वाङ्मयीन व्यक्तित्वाची जडणघडण ही प्रामुख्याने कोईमतूर येथील वानिकी महाविद्यालयात झाली आहे. वनखात्यात नोकरी पत्करल्यानंतर विख्यात पक्षितज्ज्ञांचा व साहित्यिकांचा सहवास त्यांना लाभला. अरण्यातील गूढरम्य शांततेचा त्यांनी वाचनासाठी उपयोग करून घेतला. वनखात्यातील नोकरीमुळे समृद्ध असा अरण्यानुभव त्यांना मिळाला. विविध भाषांचे अध्ययनही त्यांना सहाय्यभूत ठरले. या सर्व संस्कारांतून चितमपल्लींचा वाङ्मयीन पिंड घडत गेल्याचे दिसून येते.

अलक्षित अशा अरण्यानुभवाच्या ललितसुंदर अभिव्यक्तीमुळे व निसर्गाला व्यक्तित्व देऊन लेखन केल्याने चितमपल्लींचे साहित्य इतर साहित्यापेक्षा वेगळे ठरले. त्यामुळे मराठी साहित्यात निसर्ग साहित्याची पहाट त्यांच्या निसर्गलेखनांपासून झाली असे म्हणणे सयुक्तिक ठरते. अरण्ये, अरण्यानुभव, अरण्यविद्या व जंगलातील माणूस यांच्यावर प्रकाश टाकण्याच्या भूमिकेतून या साहित्याची निर्मिती झाली आहे.

चितमपल्लींनी काही रूपांतरीत, भाषांतरित स्वरूपाच्या कथा लिहिल्या असल्या तरीही निसर्गानुभव हाच प्रामुख्याने त्यांच्या साहित्यातील अभिव्यक्तीचा आधार आहे. एकमेवाद्वितीय अशा या विषयात निसर्गाची विविध रूपे त्यांनी टिपली आहेत. त्यांच्या ललितलेखनातून जंगलातील माणूस

प्रकटत असला तरी तो निसर्गाचा घटक म्हणून येतो. निसर्ग दर्शनासाठी त्यांच्या साहित्यात येणारी ही व्यक्तिचित्रे हे निसर्ग दर्शन घडविण्यासाठी येतात. चितमपल्लींच्या साहित्यात व्यक्तिचित्रांच्या भावदर्शनासाठी निसर्ग येत नसून निसर्गदर्शनासाठी व्यक्तिचित्रे येतात. हा एक त्यांच्या साहित्यातील महनीय असा विशेष आहे. त्यामुळे निसर्ग हाच त्यांच्या ललित लेखनातीन केंद्रबिंदू ठरतो, नायक ठरतो. रूप, रंग, गंध आणि उपयुक्तता अशा विविध स्तरांवरुन त्यांनी वैशिष्ट्यपूर्ण अशा वृक्षवेध घेतला आहे, अरण्य विद्येचा भक्कम पार या 'वृक्ष' गानाला लाभला आहे.

पक्षिवर्णनातही कमालीची कल्पकता दिसून येते. सृष्टीच्या या भाटांचे वर्णन करताना चितमपल्लींच्या सौदर्यग्राही मनाचे विलोभनीय कवडसे पाहायला मिळतात. प्रतिमेच्या भाषेतून व शास्त्रीय ज्ञानाला ललितसुंदर आवरण देऊन चिमतमल्लींनी विलोभनीय विहंगदर्शन घडविल्याने त्यांच्या लेखनांतील हे पक्षी वाङ्मयीन दृष्ट्या उंचावर जाऊन पोहोचतात. त्यांच्या पशु-पक्षी वृक्षवर्णनात शास्त्रीय दृष्टिकोन जाणवतो, परंतु ललितगद्याच्या प्रकृतीला या दृष्टीकोनाचा जाच मात्र ते होऊ देत नाहीत. सूक्ष्म निरीक्षण, कलात्मक ताटस्थ त्यांच्या लेखनांतून जाणवते.

अरण्यातील वास्तव्याचा संस्कार त्यांच्या लेखनावर झालेला दिसतो, त्यामुळे गूढरम्यता अद्‌भुतरम्यता त्यांच्या लेखनांतून वारंवार डोकावते. चितमपल्लींचे मन हे संवेदनशील व निसर्गचित्र टिपणारे आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनांतून रम्य ऋतुचित्रे, वेगवेगळ्या प्रहरांची सुंदर वर्णने आढळतात. अद्‌भूतरम्य व अनोख्या अशा अनुभवविश्वामुळे त्यांच्या लेखनांत निसर्गलीलांचे वर्णन येते. चितमपल्लींच्या आत्मपर लेखनांतून त्यांच्या संवेदनशील व कुटुंबवत्सल मनाचे दर्शन घडते. अशा लेखनांतून त्यांची चिंतनशील वृत्ती ही दिसून येते. तरल कल्पनाविलास, नाट्यमयता, गूढरम्यता, अद्‌भुतरम्यता, कथात्मकता, चित्रमयता, भावसौंदर्य, चिंतनशीलता, इ. गुणविशेष त्यांच्या निसर्गलेखनांत आढळतात.

चितमपल्लींच्या अरण्यानुभवला वास्तवाचा भक्कम आधार, बेगडी कल्पनारम्यता त्यात नाही. त्यांच्या अनुभवात घरकोंबडेपण नाही तर रानवाटांची माहेरओढ आहे. निसर्गाला व्यक्तित्व आणि मानवी संदर्भ देऊन ते लेखन करतात त्यामुळे त्यात जिवंतपणा जाणवतो. निसर्गानुभवाच्या अभिव्यक्तीसाठी निसर्गाचाच मोठ्या कलात्मकतेने त्यांनी वापर करून घेतलेला दिसतो. त्यामुळेच आशय आणि अभिव्यक्ती यांच्यात कलात्मक व निसर्गदत्त अद्वैत अनेकवेळा जाणवते.

लोकवाङ्मयाची सुंदर जोड त्यांच्या लेखनाला लाभली आहे. लोककथा, लोकगीत व लोकसमजांचा त्यांनी आपल्या लेखनांत कौशल्याने वापर करून घेतला आहे. त्यामुळे त्यांच्या निसर्ग

लेखनात अद्‌भुतरम्यता आली आहे. ललितलेखनाला अशावेळी शास्त्रीय दृष्टिकोनांपासून ते मुक्त ठेवतात. लोकवाङ्‌मयाचा आधार घेत असताना त्यातील समज, गैरसमजांवर एक प्रकारचा सुप्त विश्वास त्यांच्या साहित्यातून प्रकटत राहतो.

संदर्भ अवतरणाच्या चपखल प्रयोगामुळे निसर्गदर्शन, संदर्भदर्शन व सौंदर्यदर्शन असा त्रिवेणी संगम त्यांच्या लेखनांत झाल्याचा प्रत्यय येतो. ही संदर्भ - अवतरणे चितमपल्लींच्या नाजूक शब्दकळेमुळे पुनर्निर्मितीचा प्रत्यय देऊन जातात.

शास्त्रीय दृष्टिकोन लेखनांत प्रकटत असला तरी काही अपवाद सोडले तर या दृष्टिकोनांचा जाच त्यांच्या ललितलेखनाला होत नाही. उलट शास्त्रीय ज्ञानामुळे त्यांच्या अनुभवविश्वाला भक्कम आधार मिळत जातो.

चितमपल्लींच्या कथासृष्टीत वन्यजीवनाचे चित्रण फारसे आले नाही. भावरम्य प्रेमकथेची पार्श्वभूमी म्हणूनच त्यांच्या कथासृष्टीत निसर्ग अवतरला आहे.

चितमपल्लींच्या 'पक्षी जाय दिगंतरा' व 'जंगलाचं देणं' या संग्रहात अनेक ठिकाणी पुनरुक्तीचा दोष आढळतो. निसर्गचित्रणातील उतारे वारंवार पुनरुक्त होतात. हे टाळता येणे शक्य होते.

चितमपल्लींची भाषा ही हिरव्या वाटांप्रमाणे रम्य आहे. अल्पाक्षर-रमणीयत्व, सुभाषितवजा वाक्ये हे त्यांच्या लेखनशैलीचे एक वैशिष्ट्य आहे. संस्कृत, प्रमाण मराठी व प्रादेशिक बोली यांच्या मिश्रणांतून त्यांची शैली सिद्ध झाली आहे.

नावीन्यपूर्ण आणि अर्थपूर्ण शब्दनिर्मिती करणे हे चितमपल्लींच्या प्रतिभेचे लक्षणीय वैशिष्ट्य आहे. वाचनाचा संस्कारही त्यांच्या लेखनांतून जाणवतो. चितमपल्लींच्या भाषाशैलीचे आणखी एक लक्षणीय वैशिष्ट्य म्हणजे निसर्गानुभवांतून बहरलेली त्यांची प्रतिमासृष्टी, निसर्ग चित्रण करीत असताना आपल्या अनुभवविश्वातील प्रतिमांचा ते जाणीवपूर्वक पण कलात्मक उपयोग करतात. निसर्गघटकांतील रूपसाहचर्याचे मनोज्ञ दर्शन त्या प्रतिमांतून ते घडवितात.

सूक्ष्म निरीक्षणशक्ती, संशोधनवृत्ती, शास्त्रीय दृष्टिकोन, सौंदर्यग्राही मन, बहुश्रुतता, चिंतनशीलता, संवेदनशीलता, व गूढरम्यतेचे आणि अद्‌भुतरम्यतेचे आकर्षण, असे चितमपल्लींचे गुणसमृद्ध वाङ्‌मयीन व्यक्तित्व या निसर्गलेखनांतून प्रकटते.

निसर्गाला व्यक्तित्व देऊन व त्याला केंद्रस्थानी कल्पून लेखन केल्याने मारुती चितमपल्लींच्या निसर्ग साहित्याने एक स्वतंत्र वाङ्‌मयप्रवाह म्हणून निसर्ग साहित्याकडे लक्ष वेधले आहे. यात संदेह

नाही. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, नवसाहित्य, आदिवासी साहित्य, मुस्लिम साहित्य अशा वाङ्मयप्रवाहांप्रमाणेच एका स्वतंत्र वाङ्मयप्रवाहाची नोंद चितमपल्लींच्या निसर्गलेखनाने मराठी वाङ्मयात झाली आहे. अशाच प्रकारचे लेखन दुर्गा भागवत, श्रीनिवास कुलकर्णी, व्यंकटेश माडगूळकर, शरदिनी डहाणूकर, शिरीष पै, ना. धों. महानोर यांनीही काही प्रमाणात केले आहे. गेल्या दोन दशकात निसर्ग साहित्याची निर्मिती मराठी वाङ्मयात होत आहे. त्यामुळे अन्य वाङ्मयप्रवाहाप्रमाणेच निसर्ग साहित्य एक वाङ्मयप्रवाह म्हणून स्वीकारण्यास मुळीच हरकत नाही. असा विश्वास मारुती चितमपल्ली यांच्या निसर्ग साहित्याचा अभ्यास केल्यानंतर व्यक्त करण्यात मुळीच अडचण वाटत नाही.